File No.SMC-31/22/2021-SMC-HEALTH

<u>सोलापूर महानगरपालिका</u>

जा.क्र.मआस/कक्ष-1/आस्था-2/20
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि.१८/04 /2021

**-: जाहिर प्रसिध्दीकरण :-**

**<u>अर्ज करण्याची -२०/04/2021 ते दि.२१/04/2021</u>**

**<u>अर्ज स्विकारण्याची वेळ :- 10.00 ते 12.30</u>**

**<u>स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर</u>**

सोलापूर महानगरपालिकेच्या NUHM अंतर्गत आरोग्य/वैद्यकीय विभागाकडे विविध रुग्णालये व दवाखान्या करीता पुर्ण वेळ दरमहा एकवट मानधनावर फिजिशिएन, वैद्यकिय अधिकारी, हॉस्पिटल मॅनेजर, स्टाफ नर्स, एक्स-रे टेक्निशिएन, लॅब टेक्निशिएन, स्टोअर ऑफिसर, ही पदे निवळ तात्पुरत्या स्वरुपात, हंगामी स्वरूपात 6 महिने कालावधी करिता भरावयाची आहेत. सदर पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, एकवट मानधन, शर्ती व अटी, अर्जाचा नमूना सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर Recruitment Notices मध्ये विस्तृत स्वरूपाची माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. इच्छूक उमेदवारांनी उपरोक्त संकेतस्थळावरून अर्जा नमूना डाऊनलोड करून विहित मुदतीत अर्ज सादर करावे.

**<u>टिप:- सध्या अन्य हॉस्पिटलकडे कार्यरत असलेल्या उमेदवारांचा विचार करणेत येणार नाही.</u>**

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
**<u>आयुक्त</u>**
**<u>सोलापूर महानगरपालिका</u>**

Digitally signed by
P.SIVASANKAR
Date:Mon Apr 19 20:26:27 IST
2021
Reason: Approved

सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-2/ 20
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि.१९ /04 /2021

**-: जाहिर प्रसिध्दीकरण :-**

**अर्ज करण्याची** २० /04/2021 **ते दि**२१/04/2021

**अर्ज स्विकारण्याची वेळ** :- 10.00 ते 12.30

**स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर**

सोलापूर महानगरपालिकेच्या NUHM अंतर्गत आरोग्य/वैद्यकीय विभागाकडे विविध रुग्णालये व दवाखान्या करीता पुर्ण वेळ दरमहा एकवट मानधनावर खालीलप्रमाणे नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात 6 महिने कालावधी करिता भरावयाची आहेत. सदर पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, एकवट मानधन, शर्ती व अटी, अर्ज स्विकारण्याचे व मुलाखतीचे ठिकाण वेळ दिनांक याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | दरमहा एकवट मानधन |
|---|---|---|---|---|
| 1. | फिजिशियन | 05 | MD Medicine किंवा MD Anesthesia /DA Anesthesia (MD Medicine यांना प्राधान्य ) | 75,000 |
| 2. | वैद्यकिय अधिकारी MBBS | 18 | मान्यता प्राप्त विद्यापीठाची MBBS पदवी इंडियन मेडिकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक | 60,000 |
| 3. | वैद्यकिय अधिकारी AYUSH | 44 | मान्यता प्राप्त विद्यापीठाची BAMS /BUMS / BHMS पदवी इंडियन मेडिकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक | 30,000 |
| 4 | स्टोअर ऑफिसर (औषध भांडारपाल) | 06 | B Pharm मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी व फार्मसी कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक.<br>स्टोअर ऑफिसर या पदाचे दोन वर्षांचा अनुभव आवश्यक | 20,000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | जी.एन.एम (स्टाफ नर्स) | 50 | 12 उत्तीण व जी.एन.एम. पास किंवा बी.एससी.नर्सिंग कोर्स पास तसेच महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक.<br>किमान दोन वर्षे कामाचा अनुभव उमेदवारांस प्राध्यान. | 20,000 |
| 6 | क्ष-किरण तंत्रज्ञ (एक्स-रे टेक्निशिएन) | 01 | मान्यताप्राप्त विद्यापिठाची भौतिक शास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी, शासनमान्य संस्थेतून क्ष-किरण तंत्रज्ञ या विषयाचे प्रशिक्षण पुर्ण | 17,000 |
| 7 | लॅब टेक्शिनिशिएन | 06 | मान्यताप्राप्त विद्यापिठाची रसायनशास्त्र, जीवशास्त्र अथवा सुक्ष्म जीवशास्त्र विषयातील पदवी, शासनमान्यता प्राप्त विद्यापिठाची DMLT परीक्षा उत्तीर्ण | 17,000 |

**टिप:- सध्या अन्य हॉस्पिटलकडे कार्यरत असलेल्या उमेदवारांचा विचार करणेत येणार नाही.**

**शर्ती व अटी.**

१. सदर पदांच्या मुलाखती ह्या अर्ज स्विकारण्याच्या दिवशीच ठिक 10.00 ते 12.30 वाजता सुरु होतील.

२. इच्छूक उमेदवारांनी अर्ज सादर करताना, अर्जावर कोणत्या पदासाठी अर्ज सादर करत आहात त्या पदाचा स्पष्ट उल्लेख करावा. एक पदासाठी एकच अर्ज ग्राहय धरण्यात येईल.

३. इच्छूक उमेदवारांनी अर्ज सादर करताना वयाचा पुरावा, पदास आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र व शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (as applicable) , शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र (असल्यास), निवासी पुरावा, चालू मोबाईल नंबर(Whatsup) व ईमेल आयडी. उमेदवारांचा सध्याचा पासपोर्ट साईज फोटोसह सोबत जोडलेले अर्जाच्या विहित नमुन्यात सामान्य प्रशासन विभाग सोलापूर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन सोलापूर येथे वर नमूद तारखेत व वेळेत स्विकरण्यात येईल.

४. अर्जाचा नमूना www.solapurcorporation.gov.in यामध्ये Recruitment Notices यामधून डाऊनलोड करावा.

५. पदासमोर नमूद मानधनाशिवाय इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

६. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी सोलापूर मुख्यलयी राहून सेवा देणे बंधनकारक राहिल.

७. प्राप्त अर्जावरून व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरून मेरिट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरिट लिस्ट तयार करताना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण ,उच्च शैक्षिणक अर्हता व अनुभवाचे गुणाची एकत्रित बेरिज करून एकूण गुणाच्या आधारे मेरिट लिस्ट तयार करण्यात येऊन संबंधित प्राप्त उमेदवारांस गुणानूक्रमे आदेश निर्गमित करण्यात येईल.

८. मुलाखती होणार नसल्याने सदर पदभरतीबाबत उमेदवारांनी कार्यालयात प्रत्यक्ष भेटू नये. त्यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांना भ्रमणध्वनीवरून कळविण्यात येईल.

९. **वयोमर्यादा** - वैद्यकिय अधिकारी पदाकरीता कमाल वय वर्षे 50 व उर्वरीत पदाकरीता कमाल वय वर्षे 43 राहिल.

१०. कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्राची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

११. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरूध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसावा.

१२. सर्व इच्छुक उमेदवारांना स्पष्टपणे सुचित करण्यात येते की, वरील प्रमाणे नमूद केलेली पदे ही महानगरपालिकेमार्फत कोवीड 19 चे रुग्णांकरीता सुरु करण्यात आलेल्या कोवीड सेंटर व रुग्णालयाकरीताची आहेत.

१३. प्रस्तुतचे जाहिरातीनुसार नियुक्त केल्या जाणाऱ्या उमेदवारांना कोवीड 19 नियंत्रणाकामी क्षेत्रीय तसेच रुग्णालयीन कामकाज करणे देखील बंधनकारक राहिल.

१४. प्रस्तुतच्या नेमणूका ह्या पुर्णपणे तात्पुरत्या/हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास महापालिकेमधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणूकीचा हक्क सांगता येणार नाही.

१५. ज्या दिवशी महापालिकेस सदर पदांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणतीही नोटिशीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

१६. उपरोक्त पदांकरीता उमेदवारांने करावयाचा अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे. अर्ज करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करताना त्यासोबत स्वत:चा नव्याने काढलेला पासपोर्ट आकाराचा 1 फोटो, जन्म तारखेचा पुरावा, शैक्षणिक अर्हता, अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित केलेल्या प्रती (उदा.गुणपत्रिका, सर्टिफिकेट, अनुभव प्रमाणपत्र, तसेच

संबंधित राज्य नोंदणी कौन्सिल कडील अद्यावत नोंदणी/नुतनीकरण प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे) सादर करणे बंधणकारक आहे.

१७. निवड केलेल्या उमेदवारांना महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये आवश्यकतेनुसार 3 शिफ्टमध्ये कामकाज करावे लागेल.

१८. प्रस्तुतचे जाहिरातीमधील पदांकरीता करावयाचा अर्जाचा नमूना जाहिरातीसोबत उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरचा अर्ज उपलब्ध करुन घेऊन उमेदवारांने सादर करणे अपेक्षित आहे. याकरिता महापालिकेमार्फत स्वतंत्रपणे अर्ज उपलब्ध करुन दिला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

१९. सदरची भरतीप्रकीया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे, अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे व पदे कमी जास्त करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेली आहेत.

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
**आयुक्त्**
**सोलापूर महानगरपालिका**

Digitally signed by
P.SIVASANKAR
Date:Mon Apr 19 20:25:15 IST
2021
Reason: Approved

# सोलापूर महानगरपालिका.सोलापूर

अर्जांचा कार्यालयीन नोंदणी क्र. :-

फोटो

प्रति,

मा. आयुक्त
सोलापूर महानगरपालिका,

विषय :- पदाचे नांव :- ---------------------------------------------- पद क्र. ----- या पदाकरीता अर्ज

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव :- ------------------------------------------------------------------------

२) जन्म तारीख :- वर्ष ----------- महिना ---------- दिवस
अक्षरी --------------------------------------------------------------------------------
वय :- -------- वर्ष पुर्ण ---------- महिने---------दिवस (जाहिरात प्रसिध्द झाली त्या दिवशी)

३) राहण्याचा संपूर्ण पत्ता :- ---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------
मोबाईल क्रमांक :- (नमूद करणे अनिवार्य)
ई-मेल ID ------------------------------------

४) शैक्षणिक अर्हता :-

| धारण करीत असलेली पदवी | बोर्ड/विदयापिठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

५) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी-

१) २)
३) ४)
५) ६)
७) ८)

वर नमूद केलेला तपशील खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे हो प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीमधील सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :-

स्वाक्षरी-

दिनांक :- /०३/२०२१

अर्जदाराचे नांव :-